IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य शतकोत्तर तालुका ‘अ’ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांचे संगणकीकरण : एक अभ्यास

श्री मुरकुटे बाळासाहेब शिवाजी
**संशोधक विद्यार्थी**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ.बालाजी एन. ढाकणे
**प्राचार्य**
कै.सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड जि. परभणी

**सार :**

प्रस्तुत लेखामध्ये संशोधकाने महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य शतकोत्तर तालुका स्तरावरील ‘अ’ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या संगणकीकारणाचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ३२ तालुका स्तरावरील ‘अ’ वर्ग शतकोत्तर शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. यापैकी ३० सार्वजनिक ग्रंथालयांनी प्रस्तुत संशोधनास प्रतिसाद दिला आहे. सदरील सार्वजनिक ग्रंथालयांच्या माहितीचे संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा उपयोग करण्यात आला आहे. सार्वजनिक ग्रंथालय हे असे ग्रंथालय असते की, जे समाजामधील सर्वसामान्य व्यक्तींसाठी खुले असते. या ठिकाणी प्रत्येक व्यक्तीला विनामूल्य किंवा अत्यल्प शुल्कामध्ये वाचन, अभ्यास, संशोधन आणि माहिती प्राप्त करण्याची सुविधा दिली जाते. महाराष्ट्रातील शासनमान्य शतकोत्तर तालुका ‘अ’ वर्ग प्राप्त सार्वजनिक ग्रंथालये ही १०० वर्षाहून अधिक जुनी आहेत व या ग्रंथालयांचे संगणकीकरण ही काळजी गरज आहे. ही ग्रंथालये एक प्रकारचा ऐतिहासिक वारसाचे जतन व संवर्धन करतात. त्यांच्याकडे असणारा दुर्मिळ ग्रंथसंग्रह वाचकांपर्यंत प्रभावीपणे पोहचवणे सहज व सोपे जाण्यासाठी संगणकीकरण आवश्यक असते. या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधनात्मक लेखामध्ये प्रतिसाद प्राप्त ३० ग्रंथालयांच्या संगणकीकरणाची सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये वाचन साहित्याची देव-घेव, संगणकांची संख्या, संगणकाधारित दिल्या जाणाऱ्या सेवा व संगणकीकरणासाठी उपयोगात आणलेली आज्ञावली या बाबींचा आढावा घेण्यात आला आहे.

**शोधसंज्ञा :** ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय, ग्रंथालय संगणकीकरण व संगणकीकरण आज्ञावली.

**प्रस्तावना** :

विकसनशील देशामध्ये सार्वजनिक ग्रंथालये व शैक्षणिक उपक्रम यांना खुप महत्त्व आहे. सार्वजनिक ग्रंथालये ही कोणासाठीही एक उत्तम विद्यालय आहे. चांगली सार्वजनिक ग्रंथालये ही लोकप्रिय शिक्षणासाठी बळ देतात तसेच लोकशाहीच्या यशस्वीतेकरिता मोलाची भूमिका पार पडतात. ज्या समाजाचा विकास झालेला आहे अशा ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालये ही माहिती केंद्र म्हणून काम करतात. सामुदायिक विकास, सांकृतिक विकास यांचे केंद्र व

रोजगारास प्रोत्साहन देणारी संस्था म्हणून सार्वजनिक ग्रंथालयांकडे पहिले जाते. मानवी जीवनाची निकड पूर्ण होण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. औपचारिक, अनौपचारिक किंवा व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून मानव शिक्षण घेत असतो. वाचकांना नवीन ज्ञान देणे, कौशल्ये विकसित करणे, मूल्ये व त्याचे महत्त्व सांगणे, दृष्टिकोण विकसित करणे इ. शिक्षणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी ग्रंथालयांची महत्वाची भूमिका असते. ग्रंथालयांनी आपल्या सेवा व सुविधांमध्ये दर्जात्मक व गुणात्मक विकास केला आहे. ही ग्रंथालये पारंपारिक सेवांबरोबर आधुनिक माहितीच्या सेवा देताना दिसून येतात. विद्यार्थी व सामान्य जनता यांची माहितीची गरज पूर्ण करण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालये आपल्या ग्रंथालयांचे संगणकीकरण करत असतात. समाजातील सर्व घटकांपर्यंत ज्ञानाचे संप्रेषण करणे, औपचारिक शिक्षणामध्ये मदत करणे, प्रत्येक समाजाचा सांस्कृतिक वारसा लिखाणाच्या स्वरुपात जतन करणे व पुढील पिढीला सुपूर्द करणे अशा अनेक जबाबदाऱ्या ग्रंथालये पूर्ण करीत असतात. (नरगुंदे,२००५) महाराष्ट्रामधील तालुकास्तरीय 'अ' वर्ग दर्जा प्राप्त ३० ग्रंथालयांचे संगणकीकारण व त्यावर आधारित केली जाणारी कार्ये याबाबत अभ्यास केला आहे.

**व्याख्या :**

**डॉ. एस. राधाकृष्णन यांच्या मते** "**ग्रंथालय** हे कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे हृदय आहे. ज्याप्रमाणे मानवी शरीराचे संपूर्ण कार्य हे हृदयावर अवलंबून असते, त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थेचे कार्य ग्रंथालयावर अवलंबून असते."

**अमेरिकन लायब्ररी असोसिएशन (ALA) च्या मतानुसार** "**सार्वजनिक ग्रंथालय** ही एक अशी संस्था आहे जिची स्थापना समुदायातील माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केली जाते आणि जी सरकारी निधी किंवा सार्वजनिक करांतून चालविली जातात."

**डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या मते,** ग्रंथालयातील अशा पुनरावृत्ती होणाऱ्या कामांसाठी (उदा. ग्रंथोपार्जन, तालिकीकारण, ग्रंथ देवघेव, दाखल नोंद करणे इ.) यंत्रांचा वापर करणे, ज्यामुळे ग्रंथपाल यांचा वेळ वाचेल आणि तो वाचकांना अधिक चांगल्या सेवा प्रदान करू शकतील, या सर्व प्रक्रियेला **ग्रंथालयाचे संगणकीकरण** असे म्हणतात.

"**संगणकीकरण आज्ञावली** म्हणजे संगणकाला विशिष्ट कार्य करण्यासाठी दिलेल्या सूचनांचा संच होय. संगणक स्वतःहून विचार करू शकत नाही, त्यामुळे संगणकास क्रमाने आणि विशिष्ट भाषेमध्ये सूचना द्याव्या लागतात, ज्याला आज्ञावली असे म्हणतात."

**उद्दिष्टे :**

१. महाराष्ट्रातील शतकोत्तर तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांची संगणकीकरणाची सद्यस्थिती जाणून घेणे.

२. महाराष्ट्रातील शतकोत्तर तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांमधून संगणकाधारित दिल्या जाणाऱ्या सेवा व उपयोगात आणलेली आज्ञावलीची माहिती घेणे.

**गृहीतके :**

१. महाराष्ट्रातील शतकोत्तर तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त बहुतांश सार्वजनिक ग्रंथालयांचे संगणकीकरण झाले आहे.

**२.** महाराष्ट्रातील शतकोत्तर तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त बहुतांश सार्वजनिक ग्रंथालयातून विविध प्रकारच्या सेवा संगणकाधारित प्रदान केल्या जातात.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून सर्वेक्षण/पाहणी या तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे.

**माहिती संकलन :**

माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली व मुलाखत या साधनाचा उपयोग केला आहे. प्रश्नावलीद्वारे एकूण ३२ तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त शासकीय सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ३० ग्रंथालयांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिलेला आहे. ३० तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त शासकीय सार्वजनिक ग्रंथालयांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**१. सार्वजनिक ग्रंथालयांची संगणकीकरणाची सद्यस्थिती :**

आजच्या आधुनिक युगामध्ये ग्रंथालयासारखे क्षेत्र मागे राहिलेले नसून या ही क्षेत्रामध्ये संगणकीकरणास सुरुवात झालेली आहे. यामध्ये सार्वजनिक ग्रंथालये सुद्धा सामान्य नागरिकांना सेवा प्रदान करण्यासाठी संगणकीकरणाची प्रक्रिया अवलंबलेली दिसून येते. आजच्या आधुनिक काळामध्ये तालुका स्तरावरील 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालये संगणकीकृत होणे आवश्यक आहेत. ग्रंथालय संगणकीकरणामुळे ग्रंथालयातील दैनंदिन कामे पूर्ण करण्याचे कार्य केले जाते. संगणकीकरण म्हणजे ग्रंथालयातील पारंपारिक कामे ही संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केली जातात. संगणकीकरणामुळे कार्यक्षमता, गती, सेवा व अचूकता साधण्यात येते. यामुळे वाचक आणि ग्रंथालयीन कर्मचारी यांच्या वेळ आणि श्रमाची बचत होते. उपभोक्त्यांना ऑनलाईन स्वरूपामध्ये सेवा प्रदान करता येते. या दृष्टिकोनातून प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.


**सारणी क्र. १**

**सार्वजनिक ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | तपशील | ग्रंथालयांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | होय | १७ | ५६.६७% |
| ०२ | नाही | ०९ | ३०.००% |
| ०३ | चालू आहे | ०४ | १३.३३% |
| | **एकूण** | **३०** | **१००.००%** |

**आलेख क्र. १**

**सार्वजनिक ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती दर्शविणारा आलेख**




सारणी व आलेख क्र. १ वरून असे दिसून येते की, महाराष्ट्रामधील शासनमान्य शतकोत्तर ३० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ (५६.६७%) ग्रंथालयांचे संगणकीकरण पूर्ण झाल्याचे आढळून आले आहे. तर ०९ (३०.००%) सार्वजनिक ग्रंथालयांनी संगणकीकरणास सुरुवात केले नसल्याचे दिसून आले आहे. तसेच ०४ (१३.३३%) ग्रंथालयांनी संगणकीकरणाची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगितले आहे. एकूणच संगणकीकरण झालेल्या ग्रंथालयांची संख्या अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे.

## २. वाचन साहित्याची देवघेव पद्धती :

सार्वजनिक ग्रंथालयातील वाचनसाहित्याची देवघेव ही वेगवेगळ्या पद्धतीने केली जाते. यामध्ये रजिस्टर, कार्ड, संगणक, स्वतंत्र पद्धत आणि इतर पद्धतीच्या माध्यमातून वाचनसाहित्याची देवघेव केली जाते. सदरील पद्धतीपैकी कोणकोणत्या पद्धतींचा उपयोग केला आहे याबाबतच्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे.


**सारणी क्र. २**

**वाचनसाहित्याची देवघेव पद्धतीबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | तपशील | ग्रंथालयांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | रजिस्टर | ११ | ३६.६७% |
| ०२ | कार्ड | ०५ | १६.६७% |
| ०३ | संगणक | १४ | ४६.६६% |
| ०४ | स्वतंत्र पद्धत | ०० | ०.००% |
| ०५ | अन्य | ०० | ०.००% |
| | **एकूण** | **३०** | **१००.००%** |

**आलेख क्र. २**

**सार्वजनिक ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती दर्शविणारा आलेख**




सारणी व आलेख क्र. २ वरून असे आढळून येते की, महाराष्ट्रामधील शासनमान्य शतकोत्तर ३० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ११ (३६.६७%) ग्रंथालये ग्रंथालयातील वाचनसाहित्याची देवाणघेवाण करण्यासाठी रजिस्टरचा उपयोग करतात. तर कार्डद्वारे वाचनसाहित्याची देवघेव करणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०५ (१६.६७%) आहे. त्याचप्रमाणे संगणकाच्या माध्यमातून वाचनसाहित्याची देवघेव करणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १४ (४६.६६%) आहे. सर्वात अधिक प्रमाणामध्ये संगणकाच्या माध्यमातून देवाणघेवाण करणाऱ्या सार्वजनिक तालुका 'अ' वर्ग ग्रंथालयांची आहे.

**३. सार्वजनिक ग्रंथालयातील विविध विभागांचे संगणकीकरण :**

महाराष्ट्रातील शासनमान्य प्रतिसाद प्राप्त ३० शतकोत्तर सार्वजनिक ग्रंथालयामध्ये विविध विभाग असतात. त्यात ग्रंथोपार्जन विभाग, नियतकालिक विभाग, तालिकीकरण, ग्रंथ देव-घेव, OPAC, ग्रंथपडताळणी इ. समावेश होत असतो. यापैकी कोणकोणत्या विभागांचे संगणकीकरण करण्यात आले आहे ते पुढील सारणीत विश्लेषित करण्यात आले आहे

**सारणी क्र. ३**

**सार्वजनिक ग्रंथालयातील विविध विभागांच्या संगणकीकरणाची माहिती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | ग्रंथालयातील विविध विभाग | ग्रंथालयांची संख्या (२१ पैकी) | प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | ग्रंथ देवघेव | १८ | ८५.७१% |
| ०२ | तालीकीकरण | ०५ | २३.८०% |
| ०३ | अंदाजपत्रक | ०८ | ३८.०९% |
| ०४ | ग्रंथ नोंद | २१ | १००% |
| ०५ | बारकोडिंग | ०८ | ३८.०९% |
| ०६ | ग्रंथ पडताळणी | ०७ | ३३.३३% |

सारणी क्र. ३ वरून असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्रातील शासनमान्य शतकोत्तर ३० सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ ग्रंथालयांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे तर ०४ ग्रंथालयांचे संगणकीकरण करणे चालू आहे. अशा एकूण २१ ग्रंथालयामध्ये विविध विभागांचे संगणकीकरण करण्यात आले आहे. यामध्ये ग्रंथ नोंद २१(१००%) सार्वजनिक ग्रंथालयांनी केले आहे. तसेच ग्रंथ देवघेव करण्यासाठी संगणकाचा उपयोग करणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १८ (८५.७१%) आहे. त्याचप्रमाणे अंदाजपत्रक व बारकोडिंगसाठी संगणकाचा वापर करणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या अनुक्रमे ०८ (३८.०९%) व ०८ (३८.०९%) इतकी आहे. तर तालीकीकरण करण्यासाठी ०५ (२३.८०%)व ग्रंथ पडताळणीसाठी ०७ (३३.३३%) सार्वजनिक ग्रंथालये संगणकाचा उपयोग करतात. एकूणच बहुतांशी ग्रंथालये ही त्यांच्या निरनिराळ्या विभागामध्ये संगणकाचा उपयोग करत असताना आढळून आले आहे.

**४. ग्रंथालय संगणकीकरणाची आज्ञावली :**

महाराष्ट्रातील शासनमान्य शतकोत्तर प्रतिसाद प्राप्त ३० सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ सार्वजनिक ग्रंथालयांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे व ४ ग्रंथालयांचे संगणकीकरण करणे सुरु आहे. अशा २१ सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये संगणकीकरणासाठी कोणकोणत्या प्रकारच्या आज्ञावलींचा उपयोग केले आहे त्याबाबतच्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.


**सारणी क्र. ४**

**संगणकीकरणासाठी उपयोगात आणलेली आज्ञावली**

| अ.क्र. | आज्ञावलीचे नाव | ग्रंथालयांची संख्या (२१ पैकी) | प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | सुलभ ग्रंथालय | ०४ | १९.०५% |
| ०२ | ई-ग्रंथालय | ०४ | १९.०५% |
| ०३ | ग्रंथप्रकाश | ०२ | ९.५२% |
| ०४ | पूर्णा सॉफ्टवेअर | ०२ | ९.५२% |
| ०५ | इट्स बॉरिअस | ०१ | ४.७६% |
| ०६ | ज्ञानदिप | ०३ | १४.२९% |
| ०७ | VFP6 | ०१ | ४.७६% |
| ०८ | Lotus | ०१ | ४.७६% |
| ०९ | तंत्रवेद | ०१ | ४.७६% |
| १० | Easy Software | ०१ | ४.७६% |
| ११ | Swati System | ०१ | ४.७६% |
| | **एकूण** | **२१** | **१००.००%** |

**आलेख क्र. ३**

**संगणकीकरणासाठी उपयोगात आणलेल्या आज्ञावलीचा आलेख**




सारणी क्र. ४ व आलेख क्र. ३ वरून असे आढळून येते की, संगणकीकरणाची प्रक्रिया पूर्ण व चालू असणाऱ्या २१ शासनमान्य शतकोत्तर सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या आज्ञावलीचा उपयोग होत असल्याचे स्पष्ट होते. सुलभ ग्रंथालय व ई-ग्रंथालय या आज्ञावलीचा उपयोग करणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या अनुक्रमे ०४ (१९.०५%) व ०४ (१९.०५%) इतकी आहे. ज्ञानदिप या आज्ञावलीचा उपयोग ०३(१४.२९%) ग्रंथालयात केला गेला

आहे. ग्रंथप्रकाश व पूर्णा सॉफ्टवेअर या आज्ञावलीचा उपयोग अनुक्रमे ०२ (९.५२%) व ०२(९.५२%) सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये करण्यात आली आहे. तर इट्स बॉरिअस, VFP6, Lotus, तंत्रवेद, Easy Software व Swati System यांचा उपयोग प्रत्येकी ०१ (४.७६%) ग्रंथालयात केला गेला आहे.

**निष्कर्ष :**

१. महाराष्ट्रामधील शासनमान्य शतकोत्तर ३० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी १७ (५६.६७%) ग्रंथालयांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. तर ०४ ग्रंथालयांनी संगणकीकरणास सुरुवात केली आहे.

२. महाराष्ट्रामधील शासनमान्य शतकोत्तर ३० 'अ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ११ (३६.६७%) ग्रंथालये ग्रंथालयातील वाचनसाहित्याची देवाणघेवाण करण्यासाठी रजिस्टरचा उपयोग करतात.

३. संगणकाच्या माध्यमातून वाचनसाहित्याची देवघेव करणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १४ (४६.६६%) आहे.

४. संगणकाधारित ग्रंथ नोंद २१(१००%) सार्वजनिक ग्रंथालयांनी केली आहे.

५. तसेच ग्रंथ देवघेव करण्यासाठी संगणकाचा उपयोग करणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १८ (८५.७१%) आहे.

६. सुलभ ग्रंथालय व ई-ग्रंथालय या आज्ञावलीचा उपयोग करणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या अनुक्रमे ०४ (१९.०५%) व ०४ (१९.०५%) इतकी आहे.

७. ज्ञानदिप या आज्ञावलीचा उपयोग ०३(१४.२९%) ग्रंथालयात केला गेला आहे.

**गृहीतक चाचणी :**

१. **गृहीतक क्र. १ साध्य झालेले आहे.** महाराष्ट्रातील शतकोत्तर तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त बहुतांश सार्वजनिक ग्रंथालयांचे संगणकीकरण झाले आहे हे सारणी क्र. १ वरून स्पष्ट होते.

२. **गृहीतक क्र. २ साध्य झालेले आहे.** महाराष्ट्रातील शतकोत्तर तालुका 'अ' वर्ग दर्जा प्राप्त बहुतांश सार्वजनिक ग्रंथालयातून विविध प्रकारच्या संगणकीकरणासाठी विविध आज्ञावलीचा उपयोग केला आहे. हे सारणी क्र. ४ वरून लक्षात येते.

**संदर्भसूची :**


१. वीर, डी.के. आणि पवार, रामेश्वर (२००१), *सार्वजनिक ग्रंथालय*, परभणी : जिल्हा ग्रंथालय संघ. पृ. ०९.

२. नरगुंदे, रेवती (२००५), *प्रलेखन आणि माहितीशास्त्र*, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

३. कोरडे, राजेश लक्ष्मणराव (२०१२), *ग्रंथालयीन संदर्भ सेवा मानवी जीवनाची गरज : एक अध्ययन*, An International Refereed & Indexed Journal in Arts, Commerce & Education. Vol.I, Issue. II, July.www.ycjournal.net

४. कुंभार, राजेंद्र (२०१५), *सार्वजनिक ग्रंथालयासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम*, ज्ञानगंगोत्री. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. डिसेंबर ते मे पृ. ४ ते ५.

५. American Library Association. (२०१३). *The ALA glossary of library and information science* (4th ed.). ALA Editions.

६. Rangnathan, S. R. (१९६१), *Reference Service*, Bombay: Asia Publishing House.

७. Ministry of Education. (1949). *Report of the University Education Commission (1948-49)*. Government of India.

८. Maurya, R. J. (२०१६), *role of oublic libraries in the development of society*, Library Waves, volume २.

९. Ranganathan, S. R. (१९६७). *The five laws of library science*. Asia Publishing House.

१०. https://dlis.maharashtra.gov.in

११. https://dol.maharashtra.gov.in/

१२. www.vikaspedia.org

१३. https://vishwakosh.marathi.gov.in/22593/